## बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे मे — २०११

## गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष—१२, गु.अ.वि., मुंबई. कुरार पोलीस ठाणे गु.र.क्र ९६/११ कलम ३६५,३६४(अ),३८७, ३४ भा.दं.वि.

१) गु.र.क्र व कलम — ९६/११ कलम ३६५,३६४(अ),३८७,३४ भादवि

२) गु.घ.दि व वेळ — दिंनाक ३०.०४.२०११ रोजी १३.०० वा सुमारास

३) गु.दा.दि. व वेळ — दिंनाक ०२.०५.२०११ रोजी २१.४० वा

४) गुन्हा उघडकीस — ३०.०५.२०११

५) फिर्यादी — शैलेश श्रीपदी यादव वय ३२ वर्षे, (बळीतचा भाऊ)

६) बळीत — डॉ. बिजेश यादव व पी.ए. अशोक यादव

७) आरोपी अटक — १) राजु लक्ष्मण जाधव वय ३२ वर्षे,
२) योगेश शांताराम वाघमारे वय २७ वर्षे,
३) ख्वाजप्पा विठल नागोरे वय २८ वर्षे,
४) मोहसीन वली मोहम्मद खान वय ४२ वर्षे

**गुन्हयाची थोडक्यात हकिगत** — दिनांक ३०.०४.११ रोजी यातील फिर्यादी याचां भाऊ डॉ. बिजेश यादव व पी.ए. अशोक यादव यांना यातील आरोपींनी काळया स्कॉर्पिओ गाडीतून घेवून जावून दिनांक ०२.०५.११ रोजी १८.३० वा मोबाईल फोनवर बोलणाऱ्या इसमाने धमकी दिली की, तुम्हारा भाई हमारे कब्जे मे है. ५ खोका चाहीये नहितो तुम्हारा भाई जिंदा नही मिलेगा यावरुन कॉलम क्र ३ प्रमाणे कुरार पो ठाणे येथे खंडणीसाठी अपहरण असा गुन्हा नोद करण्यात आला.

कक्ष—१२ च्या पथकाने या गंभीर गुन्हयाचे आव्हान स्विकारून दुर्लक्षित दुव्यांच्या आधारे आरोपींबाबत माहिती काढणे सुरू केले. अनेक ठिकाणी चौकशी केल्यावर व सातत्याने प्रयत्न केल्यावर आरोपींबाबत माहिती मिळाली. वसई व उत्तरप्रदेश येथे पथक पाठवून चौकशी करण्यात आली. वसई येथून ओमप्रकाश गिरीजांशंकर मिश्रा, वय ३१ वषे याचेकडे चौकशी केली तसेच उत्तरप्रदेश येथील भदोही येथून एसटीएफ, वाराणसी यांच्या मदतीने संतोष ज्वालाप्रसाद दुबे उर्फ भीम, वय ३४ वर्षे, राहाणार नालासोपारा, मुंबई याला चौकशीकामी ताब्यात घेवून मुंबईत आणले. दिनांक ३०.०५.२०११ रोजी चौकशीत त्यांचा या गुन्हयात सहभाग निश्चित झाल्याने त्यांना अटक करून कुरार पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले.

दरम्यान उत्तरप्रदेश येथे गेलेल्या पथकाने एसटीएफ, वाराणसीच्या मदतीने गुन्हयातील अन्य आरोपी विजय राधेश्याम ओझा उर्फ बबलु उर्फ अतिम दुबे, वय २६ वर्षे, राहाणार कुरार

गांव, मुंबई यांस ताब्यात घेतले. अटक आरोपींच्या चौकशीत आतापर्यंत निष्पन्न झाले आहे की, ओमप्रकाश मिश्रा व विजय ओझा हे दोघेही डॉ. द्रिजेश यादव यांच्या परिचयाचे होते. त्यांनी द्रिजेश यादव बाबत इत्यंभूत माहिती संतोष दुबे यास पुरविली. संतोष दुबेने डॉ. द्रिजेश यादव यांना राकेश यादव नावाने फोन करून सापळयात अडकविले. त्यानंतर बिहार व उत्तरप्रदेश मधील अन्य साथीदारांच्या मदतीने पळवून नेवून सुरत येथे एका बंगल्यात अटकावून ठेवले. कोणालाही संशय येवू नये म्हणून एका आरोपीची पत्नी व लहान मुले बंगल्यात ठेवली. त्यांचा बिहार मधील मुख्य साथीदार फिर्यादीस फोन करून धमकी देण्याचे काम करीत असे.

आरोपी संजय साह हा गोवा येथील म्हापसा येथे असल्याची माहिती मिळाल्यावरून कक्ष—१२ च्या पथकाने तेथे जावून संजय साह यांस चौकशीकामी मुंबईत आणले. त्याचा सहभाग निश्चित झाल्यावर त्यास दिनांक २०.०७.२०११ रोजी अटक करण्यात आले असून त्याचा ताबा कुरार पोलीस ठाण्याकडे देण्यात आलेला आहे.

**एकंदरीत बातमीदार व कौशल्याने केलेला तपास या आधारे सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.**

गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष—१२, गु.अ.वि., मुंबईच्या नमुद पथकाने पोलीस कर्तव्यातील गुन्हे तपासाचा व्यवसायीक कस लावून सदरच्या अतिशय कठिण व किचकट गुन्हयाची उकल केल्याने **मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना मे — २०११ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ठ गुन्हे शोधाचे पारितोषिक जाहिर केले आहे.

**<u>तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांची नावे....</u>**

१) पो.नि. सुभाष सावंत/कक्ष—१२, गु प्र.शा

२) स.पो.नि. संदिप विश्वासराव/कक्ष—१२,गु.प्र.शा

३) स.पो.नि. विजय कांदळगावकर/कक्ष—१२, गु.प्र.शा

४) स.पो.उ.नि.क्र.१७२०९/देशमाने /कक्ष—१२,गु.प्र.शा

५) पो.ह.क्र.२३६७२/एम.एस.राणे/ कक्ष—१२, गु.प्र.शा

७) पो.ना.क्र ९७१४/डि.बी.कांबळे, कक्ष—१२, गु.प्र.शा

८) पो.शि.क्र ९६०२२४/एस.डी.संखे/ कक्ष—१२,गु.प्र.शा